Vol. 5 | No.5 | October 2019 Impact Factor: 4.197 ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

## IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY



*Guest Editor*
**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*
**Dr. M. D. Kachave**

*Assistant Editors*
**Dr. B. V. Andhale**
**Dr. M. G. Somvanshi**
**Dr. A. B. Sarkale**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


1. Social Media and Mental Health Issues in Youth: Cause for Concern
   **Dr. Jitendra S. Gandhi** — 01
2. Social Media and Environmental Awareness in Present Time
   **Mr.Sambhaji Dadarao Patil** — 09
3. Social Media in the Library Service
   **Dr.S.S. Rathod** — 16
4. Social Media and Education
   **Dr. Shinde Manik Panditrao** — 18
5. Impact of social media on society and Youth
   **B.K.Amlapure** — 21
6. समाजमाध्यम आणि लोकशाही राजकारण
   **डॉ.विठ्ठल दहिफळे** — 25
7. समाज माध्यमांचा समाजावरील प्रभाव
   **बांगर नितीनकुमार बाबासाहेब** — 33
8. सोशल मीडियाचा वाणिज्य, व्यापार व बँकींग क्षेत्रातील वापर
   **डॉ. डी. बी.सोळुंके** — 39
9. पर्यावरण संवर्धनाचा वाटाड्या : सोशल मीडिया
   **डॉ. गंगणे जीवन सुदामराव** — 43
10. जागतिकीकरण आणि प्रसार माध्यमे
    **फाजगे ए. के** — 47
11. 'मेलं नाही अजून अभाळ' या काव्य संग्रहातील सोशल मिडीयाचे संदर्भ एक अभ्यास.
    **डॉ.काळे बी.एम.** — 51
12. समाज व सोशल मिडीया
    **डॉ. कारिकंटे जी.आर.** — 58
13. प्रसार माध्यमांतील जाहिरात लेखन कला
    **डॉ. कोतमे धिरजकुमार सत्येकाल** — 63
14. सोशल मिडीया आणि राजकीय पक्षांची जबाबदारी
    **डॉ. दत्ता मा.कुंचेलवाड** — 68
15. समाज माध्यमांची कृषी विकासातील भूमिका
    **डॉ.सुरेश त्रिं. सामाले** — 73
16. युवक आणि सोशल मिडिया
    **एस.एस.गव्हाणे** — 80
17. कृषि क्षेत्र में सोशल मिडीया का अनुप्रयोग
    **डॉ. डमरे मोहन मुंजाभाऊ** — 84

Sonpeth
Pin-431516

## 11.

# 'गेलं नाही अजून आभाळ' या काव्य संग्रहातील सोशल मिडीयाचे संदर्भ : एक अभ्यास.

डॉ.काळे बी.एम.
मराठी विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर म.सोनपेठ

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. समाजाचं प्रतिबिंब साहित्यात उमटते. लेखक हा समाज जीवनाचा भाग असतो. तो जगतांना तीन नात्यांनी जगत असतो. एक नातं निसर्गाशी दुसरं समाजाशी तर तिसरं नातं स्वतः शी असते. हे तिसरं नातं महत्वाचं असत. समाजात घडणा–या बदलांची नोंद तो टिपत असतो. समाजात घडणा–या क्रिया–प्रतिक्रिया यांचा त्याच्यावर परिणाम होत असतो. मानवाच हित हे त्याच्या लेखनाच्या केंद्रस्थानी असते. समाजात मानवी प्रगतीला अडथळा ठरणा–या घटनांनी तो अस्वस्थ होत असतो. मानवी प्रगतीला पोषक ठरणा–या घटनांचे समर्थन करतो या शतकात मानवाने प्रचंड प्रगती साधली आहे. अवघं मानवी जीवन तंत्र आणि यंत्राने व्यापून गेलं आहे. एखादा मोठया आंतरराष्ट्रीय कंपनीपासून गल्लीतल्या टपरीवाल्यापर्यंत आणि राष्ट्राच्या प्रमुखापासून एखादा शेतमजुरापर्यंत प्रत्येकजण सोशल मिडीयाशी निगडीत आहे. साहित्य त्याला कस अपवाद राहू शकतं. साहित्यातही सोशल मिडीयाचे संदर्भ येताना दिसतात. प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण कवी बालाजी मदन इंगळे यांच्या 'गेलं नाही अजून आभाळ' या काव्य संग्रहातील सोशल मिडीयाचे आलेले संदर्भ यांचा शोध घ्यावयाचा आहे.

महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण वांडमय पुरस्काराने सन्मानित कवी बालाजी मदन इंगळे हे मराठी साहित्य विश्वात ग्रामीण कवी म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांचे 'गेलं नाही अजून आभाळ व मातरं' हे दोन काव्य संग्रह व झिंग पोरी झिंग ही कादंबरी प्रसिध्द आहे. त्यानी आपल्या वांडमयातून शेतक–यांच्या व्यथा वेदनांना मुकर केले आहे. शेतात राबणा–या बापाच्या डाळयावरून असंख्य मोबाईल व नेटवर्क चे जाळे गेलेले असते. पण बाप मात्र

कामाच्या धडपण्यात आपल्या पत्नीला बोलू शकत नाही. हे वास्तव सांगताना कवि म्हणतो,

वावरात कुळवात असणा–या
बापाच्या डोक्यावर
पसरलेलं असतं
असंख्य मोबाईल कंपन्यांच्या
नेटवर्कचं जाळं
बाप मात्र
कामाच्या धबडग्यात
बाजूच्या तुकडयात
खुरपणा–या आईशी
दिवस दिवस बोलू शकत नाही

अशा या शेतक–याच्या नशिबी आठरा विश्व दारिद्रय असतं. वावरात राबणा–या शेतक–यांना निसर्गावर अवलंबून राहावे लागते. इथला निसर्ग लहरी कधी पाऊस पडला तर खुप पडतो. तर कधी पडत नाही. नापीकी, कर्ज हे त्याच्या पदरी ठरलेलं असतं. त्याला 'राजा' म्हटलं जातं. कवी म्हणतो, गडी, किल्यातुन राजवैभवाच्या खुणा दिसतात. पण एकेकाळी शेतकरी हा राजा होता. पण त्याच्या घरी राजेपणाची कोणतीच खुण दिसत नाही. शेतकरी आणि नोकरदार यांच्यातील फरक सांगताना कवी म्हणतो नोकरदारांना मान आहे तर शेतक–यांना सन्मान नाही. नोकरदारांना महागाई वाढली की महागाई भत्ता आहे. शेतक–यांना माहागाई भत्ता नाही. नोकरदारांना निवृत्ती नंतर निवृत्ती वेतन आहे तर शेतक–यांना मरेपर्यंत शेतात काम करावे लागते. या व्यवस्थेने शेतक–याला चोर ठरवले तर नोकरदारांना साव ठरवले. व्यवस्थेविरूध्द ग–हाणे मांडतांना शेतकरी बाप म्हणतो–

बाप पोटतिकीन बोलतो
व्यवस्थेविरूध्द गा–हाणं मांडतो
दारिद्रय दुष्काळ कष्ट कर्ज
याबद्यल हाहो फोडतो
पण बापाचे सगळे calls
Divert कलेले
तेही dead phone केले !

Ramesh Warpudkar ... Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

Late R... College ...npeth ...31516 ...

शेती व्यवसाय हा आतबट्याचा व्यवसाय झाला आहे शेतात राबणा–याच्या पदरात दारिद्रय हे वाढलेल. दुष्काळ, नापिकी, कर्ज, कष्ट यावर शेतकरी ग–हाणं मांडतात. पण त्यांच्याकडे दुर्लक्ष केल जात. आज शेतक–यांच्या मुलांची अवस्था बिकट आहे. लग्नाचे वय उलटून गेल आहे. त्यांना मुलगी दयायला कुणी तयार नाही त्यामुळे कविने वधु पाहिजे या कवितेतुन रंग ऊन वारा पावसाने रापलेल्या वर विषयी माहिती देऊन उपासमारीची तयारी असणारी व पतीने आत्महत्या केली तर लेकरांना घेऊन जगणारी अशी वधू पाहिजे याचे भयावह चित्र या कवितेतुन मांडले आहे.

भारतीय शेती मोसमी पावसावर अवलंबून आहे. तिला मान्सूनचा जुगार असे म्हणतात. सिंचनाच्या सुविधा फार अपु–या प्रमाणात असल्याने भारतीय शेतक–यास पावसावर अवलंबून रहावे लागते. लहरी पावसामुळे शेतक–यांच्या नशिबी नापिकी ठरलेली असते. अवर्षण म्हणजे दूष्काळ तर अतिवृष्टी म्हणजे ओला दुष्काळ अवेळी पावसामुळे पिकांचे होणारे नुकसान पूर, चक्रीवादळे, भूकंप, पिकांवरील रोगराई, होळहाळ यामुळे शेतक–यांच्या नशिबी नापिकी ठरलेली असते. याचेच चित्रण 'पाऊस' या कवितेतून कवी करतो.

कमी पाऊस
जास्त पाऊस
पावसाची ओढ
दुष्काळ
नापिकी
अल्पउत्पन्न
न परवडणारी मजुरी
योग्य भाव नाही...
सगळया गोष्टी माझयासमोर
पण पाऊस
दुस–याच्या हाती

शेतीचा व्यवसाय हा बेभरवशाचा आणि अनिश्चित आहे. त्याचे कारण शेतक–याने कितीही कष्ट केले, त्याची काटेकोर अंमलबजावणी केली तरी त्याला यश येत नाही कारण 'पाऊस' दुस–याच्या हाती आहे.

शेतक–यांची मुलं शिकली पण त्यांना नोकरी नाही परिणामी त्यांना शेतातच काम करावे लागते. पण त्यांना शेतीही

तेवढी जमत नाही. नोकरीही नाही शेतातील काम पण जमत नाही अशी अर्धवट बांधावरून शेती हकणारी एक नवीनच पिढी त्यामुळे जन्माला आली. टी.व्ही., मोबाईल, गावातील राजकारण यामुळे त्याचे वेळापत्रक बिघडले याचे चित्रण कवीने 'परिवर्तन' या कवितेतून केल आहे.

Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani

घरी टी.व्ही. आला
आणि बापाच शेताचं वेळापत्रक बिघडलं
आता बाप
तालुक्याहून आला की
टी.व्ही.बघत राजकारणावर बोलतो.
एकदा पेरून आला की राशीलाच
शेताकडे जातो
आणि न चुकता
कधी नशिबाच्या
कधी निसर्गाच्या
कधी सरकारच्या नावानं बोंब मारतो.

मध्यम, लहान शेतकरी हे पारंपारिक पध्दतीने शेती करत असत. त्यात भरपूर उत्पन्न मिळवण्याची शक्यता कमी होती. पण सुरक्षितता होती. त्यात एक पारंपारिक शाहणपण होते. जुन्या शेतीतंत्रात सर्वच कुटुंब शेतीत रमत असत. जे श्रमसंस्कृती ही आपली जीवनशैली म्हणून शेतीला पुरक असे जोडधंदे करीत असत. नव्या शेती तंत्रामुळे शेती म्हणजे जुगार झाला आहे. सधन शेतकरी हा जुगार खेळू शकतो. नुकसान झाले तर ते सोसू शकतो. पण लहान शेतकरी हे सहन करू शकत नाहीत. याचे चित्रण कवीने 'बदका, बदका नाच रे' या कवितेतून केल आहे.

बाजारातून आणलं तंत्रज्ञान
सर्व कुणब्यांना दिल ग्यान
एक कुणबी चुकला
कर्जाखाली दबला
कर्ज तोडी क्षणक्षण
झाड–दोरी वाटे भुषण

साधारणे 1990–91 पासून पारंपारिक पध्दतीने शेती करण्याऐवजी आधुनिक पध्दतीने ती केली जाऊ लागली. त्यासाठी

Late Ram... College ...peeth ...516

उच्च दर्जाचे सुधारित संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके याचा वापर होऊ लागला. हया सा–या गोष्टी अतिशय महागडया असल्यामुळे उत्पादन खर्च मोठया प्रमाणावर वाढला. त्यासाठी शेतक–यांना जास्त कर्ज काढावे लागले. त्याचबरोबर वाहतूक, मजूरी, व्याजाचे दर यामध्येही मोठी वाढ झाली. पिकाचा उत्पादनाचा खर्च भरून निघेनासा झाला. शेतकरी अधिकच कर्जबाजारी होऊ लागला. कर्ज फेडण्याच्या चिंतेन त्याला ग्रासलं आणि त्यावरील उपाय म्हणून तो आत्महत्या करू लागला याचे चित्रण कवीने ताकदीने मांडले आहे.

शेतक–यावर ओढवलेले हे संकट आजच म्हणजे गेल्या काही वर्षात तयार झाले असे नाही. त्याची पाळेमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सरकारी धोरणामध्ये आहे. स्वातंत्र्यानंतर सरकारने जे शेती विषयक धोरण स्विकारले त्यावेळी भारत कृषीप्रधान देश असूनही शेती विकासाकडे त्या त्या वेळी काम करणा–या सरकारने जबाबदारीने लक्ष दिले नाही. पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीविषयक विकासकामांना स्थान दिले नाही. त्याच्या परिणामातुनच शेतक–याची अवस्था बिकट झाली.

अठराविश्वे दारिद्रय हे शेतक–यांच्या पाचवीलाच पूजलेले असते. शेतकरी म्हणजे काबाडकष्ट करणारा, राबणारा पण निसर्ग साथ देत नाही. त्याची शेती तर निसर्गाच्या पाण्यावरच अवलंबून आहे. 'पाऊस ई–मेल कर' या कवितेतून हीच भावना व्यक्त केली आहे. तिफन सजून बसलेली आहे. माती देखील असुसलेली आहे. पण नक्षत्रावर नक्षत्र कोरडे जातात तेव्हा कवी म्हणतो.–

आता पिशवीतील बियाण्यांची पोत्यातील 'डीएपी' ची
एक्सपायरी डेट संपण्या आधी
आणि सगळया जीवांची तडफड होण्याआधी पोरा,
तिकडचा थोडा पाऊस इकडे ई–मेल कर.

निसर्गाच्या अवकृपेमुळे शतक–याची सगळी गणितं चुकतात. कर्जाचा डोंगर कसा उतरायचा, मुलांची शिक्षण, लग्न, कपडालता एक की दोन अनंत प्रश्नांनी ग्रस्त असणा–या शेतक–याला मृत्युला कवटाळण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्याच हे सगळं दुःख इंटरनेटवर अपलोड कराव असं कवी म्हणतो–

कष्ट
वेदना बैलांसोबतचा

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

नांगरटीतला
युगांचा प्रवास
इंटरनेटवर
अपलोड करावा म्हणतो.

शेतकरी एकीकडे दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देत जीवन जगतो तर दुस–या बाजूनं सरकारही त्यांचे शोषण करते. त्यांना मदत करायचे तर सोडाच परंतु त्याचे त्यालाच देण्याची दानत या देशात राहिली नाही. घोषणा मात्र 'जय जवान जय किसान' अशी करायची त्याला 'शेतकरी राजा' म्हणायचे त्याचा जयजयकार करायचा पण प्रत्यक्षात त्याची पदोपदी अडवणुक करायची असे दुटप्पी धोरण आहे.

एकेविसाव्या शतकात भारत जागातील एक महासत्ता बनेल असे चित्र एका बाजूला रंगविले जात आहे. आणि दुसरीकडे जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आत्महत्या करत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, पुर, नापिकी, दुबार– तिबार पेरणी, शेतीमालाला मिळणारे मातीमोल भाव खतांचे–कीटकनाशकांचे वाढलेले भाव तुबलेले कर्ज यामुळे शेती व्यवसायाची दिवसेंदिवस परवड होत आहे. शेती पिकवून कर्ज फिटत नाही. भांडवलाशिवाय शेती करता येत नाही. शेती विकून कुठे जाता येत नाही. निसर्ग साथ देत नाही. सरकारी दाद देत नाही. अशी शेतक–यांची कुचंबना चालू आह. परंतु कवी आणखीही आशावादी आहे. त्याला स्वप्न पडते.

बैलगाडी ऐवजी
बाप मर्सिडीज बेन्झमधून शेताकडे
येतो आहे.
एसी गोठयातील बैलांना पाणी
पाजून
ट्रॅक्टरनं नांगर मारतो आहे.
'ऊसाला पाणीदे' असा
एसएमएस गडयाला करून
मोबाईल वरून 'भाकर घेऊन ये'
असं आईला सांगतो आहे.

कवीचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरावयाचे असेल तर ग्रामीण भागाशी ज्याची नाळ जोडली गेली आहे त्या नेत्यांनी,

राज्यकर्त्यांनी, तत्वचिंतकांनी, शिक्षक अधिकारी, पदाधिक–यांनी प्राध्यापक–विचारवंतांनी, पत्रकार साहित्यिकांनी प्रामाणिकपणे सकारात्मक पावले टाकली पाहिजेत. एकूणच शेतक–यांची परिस्थिती अत्यंत गंभीर, भीषण आहे ती बदलणे काळाची गरज आहे.

या कवितेत कवीने सोशल मिडीयाशी संबंधित अनेक दाखले दिले आहेत. संगणक, माऊस, मोबाईल एसएमएस, नेट, इंटरनेट, कॉल, कॉल रियव्हर्ड, हेड फोन, लाईफटाईम कार्ड, कवीने शेतक–यांच्या व्यथा मांडतांना केला आहे. समाजातील कुठल्याही वर्गापेक्षा शेतक–यांच्या श्रमाला अधिक महत्व आहे. त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याची जबाबदारी आपली आहे. नाहीतर या कृषीप्रधान भारताची श्रमनिष्ठ संस्कृती आपल्याला कधीच माफ करणार नाही.

## संदर्भ सूची :–


- मेलं नाही अजून आभाळ – बालाजी मदन इंगळे
- अक्षरवैदर्भी
- शेतक–याच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय – संपादक नरेंद्र लांजेवार


❑❑❑


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth 431516 Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani